# NAGPUR CITY POLICE COMMISSIONERATE

नागपूर शहर पोलीस आयुक्तालय

(पोलीस वार्तापत्र)

(सायंकाळ)

**दिनांक २४.०९.२०२६ गुरूवार**

**मा. न्यायालयातुन आरोपीला सश्रम कारावासाची शिक्षा :—**

दिनांक २४.०९.२०२६ रोजी, मा. अतीरिक्त न्यायाधीश—०२, नागपुर, श्री. एस. एच. ग्वालानी साहेब यांनी त्यांचे कोर्टचे विशेष केस क्र. २१५/२०२२ मधील, पोलीस ठाणे मानकापुर येथील अप. क्र. १८८/२०२१ कलम ३९७, ३९३, ३९४ भा.दं.वि. या गुन्ह्यातील आरोपी अयाज अहमद खान वल्द अनिस अहमद खान, वय ३३ वर्षे, रा. मेकोसाबाग, सिंधी कॉलोनी, पहनावा बुटीक समोर, जरीपटका, नागपूर याचेविरूध्द साक्षी पुराव्याअंती गुन्हा शाबीत झाल्याने, **आरोपीस कलम ३९४, ३९७ भा.दं.वि. कायद्यान्वये ०७ वर्षे सश्रम कारावासाची शिक्षा व १०,०००/— रू. दंड आणि दंड न भरल्यास ०६ महीने अतिरीक्त कारावासाची शिक्षा ठोठावली.**

फिर्यादी ह्या एमएसईबी मध्ये बिल कलेक्शन चे काम करतात. दिनांक १७.०५.२०२१ चे १३.३० वा. चे सुमारास, फिर्यादी ह्या पोलीस ठाणे मानकापुर हद्दीत पागलखाना चौक, एन.ए.डी.टी. कार्यालय चे बाजुला, एमएसईबी कार्यालय येथील बाथरूममध्ये गेल्या असता, नमुद आरोपीने फिर्यादीला लॉकरची चाबी मागुन, जबरी चोरी करण्याचे उद्देशाने दगडाने फिर्यादीचे डोक्यावर मारून व डोके बाथरूमचे भिंतीवर आपटुन फिर्यादीस जखमी केले. अशा फिर्यादी यांनी दिलेल्या तक्रारीवरून पोलीस ठाणे मानकापुर येथे आरोपीविरूध्द गुन्हा नोंदविण्यात आला होता. आरोपीला दिनांक २५.०५.२०२१३ चे ०२.४८ वा. चे सुमारास अटक करण्यात आली होती.

गुन्ह्याचे तपासी अधिकारी तत्कालीन पोउपनि. अमित मिश्रा यांनी मा. कोर्टात तपासाअंती दोषारोपपत्र सादर केले होते. सदर खटल्यात सरकारी अभियोक्ता म्हणून ॲड. श्री. कमलाकर यांनी तर, आरोपीतर्फे ॲड. श्री. अब्दुल मतीन यांनी काम पाहिले. सदर गुन्ह्यात कोर्ट पैरवी अधिकारी मपोहवा. स्वाती बोरकर यांनी काम पाहिले

**(कामगिरी)**

**१) पोलीस आयुक्तालय, नागपूर शहर अंतर्गत ''ऑपरेशन ऑल आऊट'' राबविलेबाबत.**

मा. श्री. विश्वास नांगरे पाटील पोलीस आयुक्त, नागपुर शहर, यांचे आदेशान्वये व मार्गदर्शनात गणेशोत्सव २०२६ विसर्जन तसेच, आगामी सण—उत्सव अनुषंगाने नागपूर शहरातील कायदा व सुव्यवस्था अबाधित राहणेकरीता आणि शहरात कोणताही अनुचित प्रकार घडू नये याकरीता समाजकंटक, सराईत गुन्हेगार, फरार आरोपी, पाहिजे आरोपी व प्रतिबंधक कारवाईतील आरोपी यांचे हालचालीवर प्रभावी नियंत्रण ठेवणे आवश्यक आहे. त्याअनुषंगाने दिनांक २३.०९.२०२६ चे २३.०० वा. ते दिनांक २४.०९.२०२६ चे ०२.०० वा. चे दरम्यान, नागपूर शहरातील सर्व पोलीस ठाणे हद्दीत ''Operation All Out'' विशेष मोहीम राबविण्यात आली.

मोहीमेत मा. श्री. विश्वास नांगरे पाटील पोलीस आयुक्तांसह, मा. श्री. नविनचंद्र रेड्डी सहा. पोलीस आयुक्त, मा. अपर पोलीस आयुक्त श्री. राजेंद्र दाभाडे, श्री. वसंतराव परदेशी, श्रीमती विनिता शाहु, मा. पोलीस उपायुक्त (परि. क्र. १ ते ६/ विशेष शाखा/गुन्हेशाखा/वाहतुक शाखा) नागपुर शहर, सर्व विभागीय सहायक

पोलीस आयुक्त, नागपुर शहर तसेच, सर्व पोलीस ठाणे चे वरिष्ठ पोलीस निरीक्षक हे आपले अधिनस्त पोलीस अधिकारी व पोलीस अंमलदार यांचेसह सहभागी होते.

Operation All Out दरम्यान पोलीस अधिकारी व अंमलदार यांची वेगवेगळी पथके तयार करुन, कोंबींग ऑपरेशन राविबण्यात आले. मोहीमेमध्ये जेल रिलीज, हद्दपार आरोपी, शरीराविरुध्द/मालमत्तेविरुध्द अभिलेखावरील आरोपी, एमपीडीए, जेल व मकोका रिलीज आरोपी तसेच, शस्त्र बाळगणारे आरोपी राहणाऱ्या वस्त्या प्राधान्याने चेक करण्यात आल्या. फरार/पाहिजे/जामीनाचे अटी भंग करणारे आरोपी, सराईत गुन्हेगार व हिस्ट्रीशीटर यांचेवर कायदेशीर कारवाई करण्यात आली. Operation All Out दरम्यान संशयास्पद वाहने, हॉटेल्स/लॉज/धर्मशाळा/रिकामी घरे, झोपडपट्टया व बांधकामस्थळे, कबाडखाने, व निर्जनस्थळे यांची विशेष तपासणी करण्यात आली. अभिलेखावरील शस्त्र बाळगणारे आरोपी तसेच, त्यांचे घराची झडती घेऊन हत्यार प्रतिबंधक कायदा, त्याचप्रमाणे अंमली पदार्थांबाबत गुन्हे दाखल असणारे आरोपी यांचे घराची पाहणी करून कारवाई करण्यात आली. नागपुर शहर हद्यीतील हॉटेल/लॉजेस/मर्मस्थळे व संवेदनशील ठिकाणांची कसुन तपासणी केली.

Operation All Out मध्ये वरीष्ठ पोलीस अधिकारी यांचेसह गुन्हेशाखा, वाहतुक शाखा, परिमंडळ क्र. १ ते ६ मधील अधिकारी व अंमलदार तसेच, नियंत्रण कक्ष येथील दंगा नियंत्रण पथके, जलद प्रतीसाद पथक हे सहभागी होते. नागपुर शहरातील यांची मोहीमेदरम्यान केलेली कारवाई पुढील प्रमाणे सविस्तर—

| **अ.क्र.** | **कारवाई** | | **एकुण** |
|---|---|---|---|
| १ | पाहिजे आरोपी | एकुण पाहिजे आरोपी | १,०९२ |
| | | तपासलेले आरोपी | १६६ |
| | | अटक केलेले आरोपी | ०२ |
| २ | फरारी आरोपी | एकुण फरारी आरोपी | ४१७ |
| | | तपासलेले आरोपी | १०३ |
| | | अटक आरोपी | ०३ |
| ३ | तडीपार आरोपी | एकुण आरोपी | १६८ |
| | | तपासलेले आरोपी | ९३ |
| | | अटक केलेले आरोपी | ०१ |
| ४ | जेल रिलीज | एकुण आरोपी | ६७९ |
| | | तपासलेले आरोपी | ११० |
| | | मिळुण आलेले आरोपी (प्रतिबंधेक कारवाई) | ११७ |
| ५ | एमपीडीए रिलीज | एकुण आरोपी | ६९ |
| | | तपासलेले आरोपी | ५४ |
| | | मिळुण आलेले आरोपी (प्रतिबंधेक कारवाइ) | २० |
| ६ | मकोका रिलीज | एकुण आरोपी | १०३ |
| | | तपासलेले आरोपी | ४७ |
| | | मिळुण आलेले आरोपी (प्रतिबंधेक कारवाइ) | १९ |
| ७ | स्थायी वॉरंट (Standing warrant) बनावणी | एकुण प्रलंबित संख्या | ४८ |
| | | किती बजावले | २३ |
| | | शिल्लक संख्या | २३ |
| ८ | अजामिनपात्र वॉरंट (NBW) बजावणी | एकुण प्रलंबित संख्या | ६२ |
| | | किती बजावले | ३१ |
| | | शिल्लक संख्या | ४३ |
| ९ | एन.डी.पी.एस. (Possession) गुन्हयातील अभिलेखावरील | एकुण आरोपी | १४४ |

| | | | |
|---|---|---|---|
| | आरोपी | तपासलेले आरोपी | ७१ |
| | | मिळुण आलेले आरोपी | ३५ |
| १० | पोक्सो गुन्हयातील अभिलेखावरील आरोपी | एकुण आरोपी | ८४ |
| | | तपासलेले आरोपी | ३९ |
| | | मिळुण आलेले आरोपी | १९ |
| ११ | जबरी चोरी (मोबाईल/चैन स्नेचिंग इत्यादी) गुन्हयातील अभिलेखावरील आरोपी | एकुण आरोपी | ९९ |
| | | तपासलेले आरोपी | ५५ |
| | | मिळुण आलेले आरोपी | १४ |
| १२ | शरिराविरुध्द गुन्हे करणारे आरोपी | एकुण आरोपी | ५१७ |
| | | तपासलेले आरोपी | २३६ |
| | | मिळुण आलेले आरोपी | १४६ |
| १३ | वाहन चोरी चे गुन्हे करणारे अभिलेखावरील आरोपी | एकुण आरोपी | १४७ |
| | | तपासलेले आरोपी | ८२ |
| | | मिळुण आलेले आरोपी | ४४ |
| १४ | घरफोडीचे गुन्हे करणारे अभिलेखावरील आरोपी | एकुण आरोपी | १७९ |
| | | तपासलेले आरोपी | ११४ |
| | | मिळुण आलेले आरोपी | ६६ |
| १५ | ३,२५/४,२५ भा.ह.का. | दाखल गुन्हे | ०५ |
| | | अटक केलेले आरोपी | ०२ |
| | | किती अवैध अग्निशस्त्र/हत्यार जप्त | ०६ |
| १६ | अंमली पदार्थ विरोधी कारवाई Possession (NDPS act) | दाखल गुन्हे | ०५ |
| १७ | अंमली पदार्थ विरोधी कारवाई Consumption (NDPS act) अवैध दारू विक्री कारवाई | दाखल गुन्हे | ०५ |
| १८ | जुगार प्रतिबंधक कारवाई | दाखल गुन्हे | २७ |
| | | जप्त मुद्दमोल | ४,७६,१००/— |
| १९ | उघडयावर दारू पिणाऱ्यांवर कारवाई | | १८ |
| २० | मपोका १४२ अन्वये कारवाई | | ०२ |
| २१ | मपोका १३५ अन्वये कारवाई | | १८ |
| २२ | मपोका १२२ अन्वये कारवाई | | १६ |
| २३ | फेरीवाल्यांवर केलेली कारवाई. | | २५ |
| | **नाकाबंदी** | | |
| २४ | वाहने तपासली | दुचाकी | ८४६ |
| | | चारचाकी | ३९१ |
| २५ | मोटार वाहन कायद्यांन्वये करण्यात आलेली कारवाई | | १०६ |
| २६ | कलम १८५ मोवाका अन्वये करण्यात आलेली **ड्रंकन ड्राईव्ह** कारवाई | | १४ |
| २७ | कलम ११०, ११७ मपोका अन्वये करण्यात आलेली कारवाई | | ८० |
| २८ | कलम ३३ आरडब्ल्यु अन्वये करण्यात आलेली कारवाई | | ०३ |
| २९ | कोटपा कायद्यांतर्गत करण्यात आलेली कारवाई | | ०४ |
| ३० | **इतर महत्वाची कारवाई** | नागपूर शहरातील ओयो हॉटेल्स्, लॉजेस, सराय, ढाबे व आस्थापना जास्तीत जास्त प्रमाणात चेक करण्यात आल्या. | |

**(गुन्हे)**

**१) पोलीस ठाणे इमामवाडा :— चोरी करणाऱ्या आरोपीविरूध्द गुन्हा दाखल.**

फिर्यादी देवेंद्र जनार्दन खिल्लारे, वय ४६ वर्षे, रा. प्लॉट नं. १३९, सेवादल, मानेवाडा रोड, नागपुर हे पोलीस ठाणे इमामवाडा हद्दीत, जाटतरोडी रोड वरील श्री. अमित गुलाबरावजी नागदिवे यांचे मालकीचे सॅटर्न

हॉस्पीटल येथे मॅनेजर पदावर कार्यरत आहेत. सॅटर्न हॉस्पीटल चे नविनीकरणाचे काम सुरू असुन, हॉस्पीटल चे करीता आवश्यक असलेले ऑक्सीजन गॅसचे कॉपर पाईप दिनांक १६.०९.२०२६ रोजी दिल्ली येथुन हॉस्पीटल येथे आणले होते व ते हॉस्पीटल चे बांधकामाचे ठिकाणी एका रूममध्ये लॉक करून ठेवण्यात आले होते. दिनांक २३.०९.२०२६ चे २०.०० वा. ते दि. २४.०९.२०२६ चे ०८.०० वा. चे दरम्यान, कोणीतरी अज्ञात चोरट्याने ऑक्सीजन गॅस पाईप ठेवलेल्या रूमचे कुलूप तोडून, आंत प्रवेश करून, रूममध्ये ठेवलेले ऑक्सीजन गॅसचे कॉपर पाईप वजनी ३१५ किलो व गॅसपाईप फिटींगचे कॉपर साहीत्य वजनी ३० किलो असा एकुण किंमती ४,१४,०००/—रू. चा मुद्देमाल चोरून नेल्याचे फिर्यादी यांना दिसून आले.

यాప्रकरणी फिर्यादी यांनी दिलेल्या तक्रारीवरून पोलीस ठाणे इमामवाडा येथे पोउपनि. नितेश सानप यांनी अज्ञात आरोपीविरूध्द कलम ३०५(अ), ३३१(४) भा.न्या.सं. अन्वये गुन्हा दाखल केला आहे. आरोपीचा शोध व पुढील तपास सुरू आहे.

**<u>२) पोलीस ठाणे राणाप्रताप नगर :— हद्दपार ईसमास अटक.</u>**

दिनांक २४.०९.२०२६ चे ०१.२० वा. चे सुमारास, राणाप्रताप नगर पोलीसांचे तपास पथक हे पोलीस ठाणे हद्दीत पेट्रोलींग करीत असता, त्यांना माहीती मिळाली की, पोलीस ठाणे हद्दीत सुभाषनगर, संत तुकडोजी नगर, गल्ली नं. ०९, जय किराणा स्टोअर्स जवळ राहणारा हद्दपार इसम नामे अंकुश उर्फ डिज्जु जमरे हा आपले राहते घरी आला आहे. अशा खात्रीशीर माहीतीवरून, पंचासमक्ष त्याचे राहते घरी चेक केले असता, तो पोलीसांना पाहुन पळुन जाण्याचे तयारीत असता, त्यास ताब्यात घेतले. त्याचे नाव पत्ता विचारले असता, त्याने त्याचे नाव अंकुश उर्फ डिज्जु किशोर जमरे, वय ३० वर्षे असे सांगीतले. आरोपीचा अभिलेख तपासला असता, त्यास पोलीस उप आयुक्त परिमंडळ क्र. ०१ यांचे हद्दपार आदेश क्र. ०५/२०२५ दिनांक २०.०९.२०२५ अन्वये नागपुर शहर व ग्रामीण हद्दीतुन ०२ वर्षाकरीता हद्दपार केल्याचे दिसुन आले. आरोपी हा हद्दपार असतांना कोणतीही परवानगी न घेता पोलीस ठाणे हद्दीत कोणतातरी गुन्हा करण्याचे उद्देशाने समक्ष मिळुन आल्याने व त्याने मनाई आदेशाचे उल्लंघन केल्याने, फिर्यादी पोहवा. विशेषकुमार गुढेवार यांनी दिलेल्या तक्रारीवरून पोलीस ठाणे राणाप्रताप नगर येथे पोउपनि. प्रशांत खोत यांनी आरोपीविरूध्द कलम १४२ म.पो.का. अन्वये गुन्हा दाखल करून, आरोपीस अटक केली आहे. पुढील तपास सुरू आहे.

**स्वा/—**

**( नितीन चुलपार )**

**सहा.पोलीस निरीक्षक,**

**पोलीस जनसंपर्क अधिकारी,**

**नागपुर शहर.**